राज्यसेवा (मुख्य) परिक्षा - २०१५ व २०१६ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट ब संवर्गातील उमेदवारांच्या परिविक्षाधीन प्रशिक्षण (सीपीटीपी-४) कालावधी करिता अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

## शासन शुध्दीपत्रक क्रमांकः कअस १३१६/प्र.क्र.१३२/१४ब

मंत्रालय, मुंबई - -४०० ०३२.
दिनांक: २६ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा:-</u>

१) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन २०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दिनांक २०.०१.२०१४**
२) **शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि २०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०.०२.२०१६**
३) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.कअस १३१६/प्र.क्र.१३२/१४ ब, दिनांक २९.०७.२०१७**
४) **शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन २०१७/प्र.क्र.४७/१७/सीपीटीपी, दिनांक १९.०९.२०१७**

<u>शुध्दीपत्रक:-</u>

संदर्भ क्रमांक (३) येथील दिनांक २९.०७.२०१७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ खालीलप्रमाणे आहे:-

"मंत्रालयीन कक्ष अधिकारी गट ब संवर्गातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०१५ च्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेले १३ उमेदवार व राज्यसेवा (मुख्य) परीक्षा -२०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या १९ उमेदवारांसाठी रू.९३००-३४८००, ग्रेड वेतन रू.४८००/- या वेतनश्रेणीत एकूण ३२ अधिसंख्य पदे दिनांक ०१.०८.२०१७ पासून दोन वर्षाच्या कालावधीसाठी निर्माण करण्याकरिता शासन मंजूरी देत आहे. "

त्याऐवजी सदर परिच्छेद आता सुधारितरित्या पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा:-

"मंत्रालयीन कक्ष अधिकारी गट ब संवर्गातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०१५ च्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेले १३ उमेदवार व राज्यसेवा (मुख्य) परीक्षा -२०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या १९ उमेदवारांसाठी रू.९३००-३४८००, ग्रेड वेतन रू.४८००/- या वेतनश्रेणीत एकूण ३२ अधिसंख्य पदे दिनांक २९.०७.२०१७ ते ३१.०७.२०१९ या कालावधीसाठी निर्माण करण्याकरिता शासन मंजूरी देत आहे. "

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२६१६४२०८६००७ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Andhra Pradesh, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2017.09.26 16:29:57 +05'30'

**(ग.भि.गुरव)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. महालेखापाल -१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०.
२. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०.
३. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
४. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे.
७. महासंचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, बोले पेट्रोल पंप जवळ, अमरावती रोड, धरमपेठ, नागपूर - ४४२ ४१०.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. अवर सचिव, का. क्र. १८-ब व २६, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. जिल्हा कोषागार कार्यालय, नागपूर.
११. वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवडनस्ती.